**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २७ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारत आणि युरोपीय संघादरम्यान मुक्त व्यापार करार.**
2. **संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात.**
3. **राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्यास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता; पहिल्या टप्प्यात नागपूरचा समावेश.**
4. **वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी मेळघाट परिसरात नरनाळा महोत्सवाचं आयोजन.**
5. **नागपूरच्या लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या वतीनं महाराष्ट्रातील एक लाख आदिवासी महिलांसाठी जीवन विमा योजना जाहीर.**

**-------------------------------------**

पीएम- ईयू

पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एँतिनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातल्या 'मुक्त व्यापार जननी कराराला' अंतिम स्वरूप देण्यात आलं. व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, आपत्ती व्यवस्थापन, ग्रीन हायड्रोजन आदी क्षेत्रात हे करार झाले. यामुळे भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील संबंध अधिक दृढ झाले असून हे करार सामायिक समृद्धीसाठीचा आराखडा आहेत, असं पंतप्रधान  नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. यामुळे गुंतवणुकीला चालना मिळेल आणि जागतिक पातळीवर पुरवठा साखळी मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी - १९ सेकंद)***

***इसे भारत के लेबर इंटेंसिव उत्पादों को यूरोपियन यूनियन मार्केट में इजी एक्सेस मिलेगा। इसमें विशेष तौर पर टेक्सटाइल, जेम्स एंड ज्वेलरी, ऑटो पार्ट्स और***

***इंजीनियरिंग गुड्स शामिल हैं। फ्रूट्स, वेजिटेबल्स, प्रोसेस्ड फूड और मरीन प्रोडक्ट्स उसमें नए अवसर बनेंगे।***

हा करार एक ऐतिहासिक क्षण असून यामुळे युरोपियन युनियन आणि भारत यांच्या संबंधाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे, असं युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष ऍंतिनियो कोस्टा म्हणाले. तर भारताच्या प्रगतीबद्दल युरोपला अतिशय आनंद होतो आहे, असं युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन म्हणाल्या. भारत आणि युरोपियन युनियन हे २००४ पासून धोरणात्मक भागीदार आहेत.

-----------------------------------------

अर्थसंकल्पीय अधिवेशन

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी, आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं . संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू , राज्य मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ. एल मुरुगन देखील बैठकीला उपस्थित होते. राज्यसभेचे सभागृह नेते जे पी नड्डा, काँग्रेसचे खासदार जयराम रमेश, द्रमुकचे तिरुची शिवा, तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष, समाजवादी पार्टीचे रामगोपाल यादव इत्यादी नेते बैठकीत सहभागी झाले. २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. तर दुसऱ्या टप्प्याचं कामकाज ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होईल.

-----------------------------------------

मंत्रिमंडळ निर्णय

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचं-ITI-पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेला आ़ज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुशल मनुष्य़बळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचं आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि पुणे येथील आयटीआयचं आधुनिकीकरण केल जाणार आहे. पुढच्या वर्षात

टप्प्या-टप्प्यान या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. योजनेकरीता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. गव्हन्मेंट आयटीआय, नागपूर, आयटीआयचं हब म्हणून विकसित करण्यात येईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामठी, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा यात समावेश आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजिविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

-----------------------------------

संजय महाकाळकर

नागपूर महानगरपालिकेत काँग्रेसने ‘नागपूर महाविकास आघाडी’ची नोंदणी सर्वात आधी विभागीय आयुक्त कार्यालयात करून राजकीय आघाडी घेतली आहे. या वेळी काँग्रेसचे सर्व 34 नगरसेवक उपस्थित होते. चार वेळा नगरसेवक राहिलेले अनुभवी नेते संजय मधुकर महाकाळकर यांची एकमतान गटनेतेपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीन या निर्णयाला तत्काळ मान्यता दिली आहे.

-----------------------------------

विजय वडेट्टीवार

चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी महाविकास आघाडी एकत्र येण्याची शक्यता असून, काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत उद्धव ठाकरे यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. या चर्चेत चंद्रपुरात काँग्रेसचा महापौर व्हावा यावर एकमत झालं असून, शिवसेनेच्या नगरसेवकांच्या पाठिंब्याबाबत पुढील चर्चा होणार आहे. अकोला आणि परभणी महापालिकेत काँग्रेसकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पाठिंबा देण्याबाबतही सहमती झाल्याचे संकेत मिळाले आहेत. भाजपकडे आवश्यक संख्याबळ नसल्यानं त्यांचे दावे फोल असल्याची टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

-----------------------------------

ऑनलाईन सोडत

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तरोडी, वांजरी आणि वाठोडा इथल्या प्रकल्पांमधील उर्वरित ५९३ सदनिकांसाठी २० जानेवारी रोजी ऑनलाईन सोडत काढण्यात आली असून ५९३ विजेते लाभार्थी

घोषित करण्यात आले आहेत. विजेत्यांची यादी अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून, लाभार्थ्यांना लवकरच इरादापत्र आणि मागणीपत्रक पाठविण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विहित मुदतीत रक्कम भरून सदनिकेचा ताबा घ्यावा, असं आवाहन महानगर आयुक्त संजय मीणा यांनी केल आहे.

-------------------------------------

नरनाळा महोत्सव-२०२६

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग आणि अकोला जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत 'नरनाळा महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. वने आणि वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती करण तसंच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. या महोत्सवात जंगल सफारी, ट्रेकिंग, रॅपेलिंग, बोटिंग यासह विविध साहसी उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. जंगल सफारी आणि स्पर्धांसाठी नोंदणी संबंधित संकेतस्थळांवर करण आवश्यक असून, महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हाव, असं आवाहन आयोजकांनी केल आहे.

-------------------------------------

ताजुद्दीन (रहमतुल्लाह अलैह) जयंती

नागपूरच्या बडा ताजबाग दर्गा संकुलात सूफी संत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांची जयंती आज भक्तीभावानं आणि उत्साहात साजरी होत आहे. या निमित्तानं ताजबाग ट्रस्टतर्फे धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून सकाळी मिरवणूक काढण्यात आली. भाविकांसाठी लंगरची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. जयंतीनिमित्त ताजबाग परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

-------------------------------------

जीवन विमा योजना

लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या वतीन महाराष्ट्रातील एक लाख आदिवासी महिलांसाठी जीवन विमा योजना जाहीर करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात 33 हजार विद्यार्थ्यांच्या मातांना विमा संरक्षण देण्यात येणार आहे. नागपूर इथं झालेल्या विशेष बैठकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या उपक्रमाच कौतुक

करत आदिवासी आणि  ग्रामीण समाजासाठी आरोग्य आणि शिक्षण सुरक्षेवर भर देण्याची गरज अधोरेखित केली. संस्थेच्या '2026 परिवर्तन रोडमॅप' मध्ये आरोग्य, शिक्षण आणि  आर्थिक सुरक्षिततेचा समन्वय साधण्यात आला आहे. यावेळी एकल विद्यालयाच्या शिक्षक-पर्यवेक्षकांना सेवा नीती कार्डच वितरण करण्यात आल. या कार्डद्वारे अपघात विमा, आरोग्य लाभ आणि  विविध सवलती उपलब्ध होणार आहेत.

-----------------------------------

लाडकी बहीण

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत ई-केवायसी करताना चुकीचे पर्याय निवडल्यामुळे लाभ बंद झालेल्या महिलांची यादी संबंधित गावांतील अंगणवाडी सेविकांना देण्यात आली आहे. लाभ बंद झालेल्या महिलांनी आवश्यक कागदपत्रे आणि स्वयंघोषणापत्रासह अंगणवाडी सेविकेशी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे. डिसेंबरअखेर ई-केवायसी प्रक्रियेदरम्यान झालेल्या त्रुटींमुळे अनेक पात्र लाभार्थ्यांचा लाभ तात्पुरता बंद झाल्याच निदर्शनास आल होत . यासंदर्भात वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी २२ जानेवारी रोजी बैठक घेऊन पुनर्तपासणीचे निर्देश दिले आहेत.

-----------------------------------

आदिवासी शेतकऱ्यांचा मोर्चा

वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करावी या आणि इतर मागण्यांसाठी आदिवासी शेतकऱ्यांचा पायी मोर्चा नाशिकहून मुंबईकडे निघाला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष प्रणित किसान सभेच्या नेतृत्वाखालच्या या मोर्चात जवळपास चाळीस हजार आदिवासी शेतकरी सहभागी झाले आहेत. सरकारन आंदोलकांच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावलं आहे. वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करावी, पश्चिमेकडील नद्यांवर बंधारे बांधून ते पाणी दुष्काळग्रस्त भागांसाठी उपलब्ध करून द्यावं, जिल्हा परिषद शाळेतली शिक्षकांची रिक्त पदं भरावीत आदी मोर्चेकऱ्यांच्या मागण्या असल्याचं जे. पी. गावित यांनी सांगितलं.

-----------------------------------

हवामान

विदर्भात  आज गोंदिया इथं 12 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली, तर नागपुरात 13 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस

इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं . उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान १४ अंश सेल्सिअस ते 18 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.  वाशीम इथं  31 पूर्णांक 8 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद झाली आहे.

-----------------------------------